महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती,
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION
AMRAVATI DIVISIONAL BOARD, AMRAVATI 444602

पत्र क्र.अविमं/माप/ २२५६
दिनांक ०४/१२/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय – मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर केल्यानंतर शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाच्या तारखांबाबत.
संदर्भ - पत्र क्र. रा.म./परीक्षा-३/५०७८ दिनांक – २०/११/२०२३.

उपरोक्त संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) मार्च २०२४ परीक्षेकरीता प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या भरलेले आवेदनपत्राच्या याद्या (Pre-list) व मंडळाकडे शुल्काचा भरणा केल्याचे चलान बुधवार दिनांक १३/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत खालील जिल्हा संकलन केंद्रावर सदर साहीत्य जमा करणेकरीता आपल्या प्रतिनिधीस अधिकारपत्रासह उपस्थित रहाण्याबाबत कळवावे.

प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट सोबत १)पुनर्परीक्षार्थी (Repeater)विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची छायाप्रत २)श्रेणीसुधार (CIS) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची छायाप्रत ३)तुरळक (Isolated) विद्यार्थ्यांसाठी पुर्वी उत्तीर्ण झालेली गुणपत्रिकेची छायाप्रत ४) दिव्यांग (Handicap) विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | जिल्हा | संकलन/वितरण केंद्राचे नाव |
|---|---|---|
| १ | अकोला | न्यु इंग्लिश हायस्कुल , अकोला |
| २ | अमरावती | अमरावती विभागीय मंडळ, अमरावती |
| ३ | बुलडाणा | श्री.शिवाजी हायस्कुल, बुलडाणा |
| ४ | यवतमाळ | अभ्यंकर कन्या शाळा, यवतमाळ |
| ५ | वाशिम | श्री. शिवाजी हायस्कुल, वाशिम |

सदर प्रकरणी सर्व मुख्याध्यापकांनी नोंद घ्यावी व आपल्या शाळांनी उपरोक्त प्रमाणे साहीत्य सादर करण्याकरीता व स्विकारणेकरीता प्रतिनिधी पाठविण्याची कार्यवाही करावी.

टिप- इ.१० वी मार्च-२०२३ १) पूर्व व्यावसायिक विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा (NSQF) प्रमाणपत्र, २)खाजगीरीत्या प्रविष्ठ विदयार्थ्यांची (फॉर्म नं.१७) मुळ कागदपत्रे, ३)मार्च-२०२३ व ४)जुलै-२०२३ मुळ प्रमाणपत्र स्विकारण्याकरीता जिल्हा संकलन केंद्रावर आपले प्रतिनिधीस अधिकार पत्रासह पाठवावे.

(निलीमा टाके)
विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती

प्रतिलिपी- १. शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीस्तव.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जि. प. अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ व वाशिम यांना माहितीस्तव.